# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

## विद्यार्थी विकास मंडळ
गणेशखिंड, पुणे – ४११ ००७.

डॉ. सविता कुलकर्णी
संचालक (अतिरिक्त कार्यभार)


संदर्भ क्र. विविमं/२०२६-२७/७१ दिनांक : ०७/०७/२०२६

प्रति,

मा. प्राचार्य / मा. संचालक/ मा. विभागप्रमुख
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी सलंग्न
असलेली सर्व महाविद्यालये व मान्यताप्राप्त परिसंस्था,
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील सर्व शैक्षणिक विभाग

**विषय :- "कलावारी" छायाचित्रण स्पर्धा आणि विश्व प्रार्थना उपक्रमात सहभागी होणेबाबत.**

**संदर्भ क्र. :-** मा. महापौर कार्यालय पुणे महानगर पालिका यांचे जावक क्र. १९९०/ दि. ०३/०७/२०२६ रोजी चे पत्र.

महोदय / महोदया,

संत तुकाराम महाराज आणि संत ज्ञानेश्वर महाराज यांच्या पालखीचे दि. ९ जुलै २०२६ रोजी पुणे नगरीमध्ये आगमन होणार आहे. उपरोक्त संदर्भीय पत्रान्वये आपणास कळविण्यात येते की, पुणे महानगरपालिका यांच्यामार्फत "पुणे प्रथम" आयोजित सेवा वारी हा विशेष उपक्रम या वर्षी प्रथमच राबविण्यात येणार असल्याचे नमूद केले आहे.

"सेवा हीच वारी" या भावनेतून वारीचा मार्ग स्वच्छ व कचरामुक्त ठेवणे, प्लास्टिक निर्मूलन आणि वारकऱ्यांची उत्तम सेवा-व्यवस्था करणे हा या मोहिमेचा मुख्य उद्देश आहे. या एवढ्या मोठ्या आणि पवित्र कार्यात विद्यापीठांतर्गत येणाऱ्या महाविद्यालयांमधील तरुणाईची ऊर्जा, उत्साह आणि सामाजिक जाणीव अत्यंत मोलाची ठरणार असून खालील विषयावरती विविध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेत सहभागी होण्यासाठी विद्यार्थ्यांनी 'punepratham.org' च्या अधिकृत वेबसाईटवरून स्वतःची नोंदणी करावी.

१) 'कलावारी' अंतर्गत छायाचित्रण (Photography) स्पर्धाः (५ ते ३१ जुलै २०२६)

२) 'विश्वप्रार्थना - सामूहिक पसायदान पठण' उपक्रमः दिनांक १० जुलै २०२६ डीजीटल लिंकद्वारे

या स्पर्धेमध्ये सहभागी होणाऱ्या सर्व विद्यार्थी, आणि स्वयंसेवकांना पुणे महानगरपालिकेतर्फे विशेष 'सहभाग प्रमाणपत्र' (Certificate) डिजिटल स्वरूपात दिले जाणार आहे. जे उपक्रमानंतर 'पुणे प्रथमच्या' अधिकृत पोर्टलवरून 'punepratham.org' वरून थेट डाऊनलोड करता येईल. मा. महापौर पुणे महानगर पालिका पुणे यांचे याबाबतचे सविस्तर पत्र आपल्या माहिती व उचित कार्यवाहीसाठी सोबत जोडले आहे.

तरी सदर उपक्रम विद्यार्थी, विद्यार्थी कल्याण अधिकारी, संबंधित शैक्षणिक विभाग यासह आपले महाविद्यालय/परिसंस्थातील एनसीसी (NCC) प्रमुख, सांस्कृतिक मंडळे आणि उर्वरित शैक्षणिक तथा सह शैक्षणिक विभाग, शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी यांना सहभागी होण्याबाबत प्रोत्साहित करावे. सदर उपक्रम महाविद्यालयातील सर्व घटकांच्या सामुहिक सहभागातून यशस्वी करण्याबाबत आपण आपल्या स्तरावर योग्य ती कार्यवाही करावी. कळावे, ही विनंती.

सोबत:- वरीलप्रमाणे

डॉ. सविता कुलकर्णी
संचालक, (अतिरिक्त कार्यभार)
विद्यार्थी विकास मंडळ

मनपा कार्यालय : ०२० २५५०१०१०
भ्रमण ध्वनी : ९८५००८९९९१ / ८६००४०६६६६
Email : mayorpune@punecorporation.org

पुणे महानगरपालिका

सौ. मंजुषा दीपक नागपुरे

महापौर, पुणे
आवक क्र. 125
दिनांक : 06 JUL 2026
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

मा. कुलगुरू यांचे कार्यालय
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
आवक दिनांक 03 JUL 2026
आवक क्रमांक व्हीसी 3729
जावक दिनांक 06 JUL 2026

नगरसचिव कार्यालय
जावक क्र: 1990
दिनांक: 03/07/26

प्रति,

माननीय कुलगुरू महोदय,

पुणे विद्यापीठ,

पुणे.

विषय: 'पुणे प्रथम - सेवा वारी' उपक्रमांतर्गत विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांना स्वयंसेवक (Volunteers) म्हणून सहभागी करून घेण्याबाबत, 'कलावारी' छायाचित्रण स्पर्धा आणि 'विश्वप्रार्थने'त जोडण्याबाबत विनंती.

महोदय,

राम कृष्ण हरी!

आपणास विदितच आहे की, महाराष्ट्राचे परम वैभव असलेला आषाढी पालखी सोहळा लवकरच आपल्या पावन पुणे नगरीत आगमन करीत आहे. या पवित्र पर्वावर, पुण्यात येणाऱ्या लाखो वारकरी बांधवांना स्वच्छ, सुंदर आणि सेवाभावी पुण्याचा प्रत्यक्ष अनुभव देण्यासाठी पुणे महानगरपालिका अंतर्गत 'पुणे प्रथम' आयोजित **'सेवा वारी'** हा विशेष उपक्रम अत्यंत श्रद्धेने व जबाबदारीने राबविण्यात येत आहे.

**"सेवा हीच वारी"** या भावनेतून वारीचा मार्ग स्वच्छ व कचरामुक्त ठेवणे, प्लास्टिक निर्मूलन आणि वारकऱ्यांची उत्तम सेवा-व्यवस्था करणे हा या मोहिमेचा मुख्य उद्देश आहे. या एवढ्या मोठ्या आणि पवित्र कार्यात आपल्या विद्यापीठांतर्गत येणाऱ्या महाविद्यालयांमधील तरुणाईची ऊर्जा, उत्साह आणि सामाजिक जाणीव अत्यंत मोलाची ठरणार आहे.

आपल्या विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालयांतील विद्यार्थी हे नेहमीच विविध सामाजिक उपक्रमांत, कला-संस्कृती आणि राष्ट्रउभारणीच्या कार्यात हिरिरीने भाग घेत असतात. वारीच्या काळात संपूर्ण पालखी मार्गावर स्वच्छतेचा संदेश देणे, प्लास्टिक मुक्तीसाठी श्रमदान करणे आणि व्यवस्थापनात मदत करणे यामध्ये कॉलेजचे तरुण अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावू शकतात. यातून विद्यार्थ्यांना एक उत्तम सामाजिक अनुभव, संवेदनशीलता आणि संस्कारही लाभतील. या उपक्रमाचा मुख्य भाग म्हणून खालील दोन विशेष मोहिमांचे आयोजन करण्यात आले आहे:

१) 'कलावारी' अंतर्गत छायाचित्रण (Photography) स्पर्धा:

वारीचे विहंगम दृश्य, भक्तीभाव आणि सेवाभाव कॅमेऱ्यात टिपण्यासाठी 'कलावारी' अंतर्गत ओपन कॅटेगरीसाठी (सर्व वयोगटांसाठी खुली) एक विशेष 'छायाचित्रण स्पर्धा' आयोजित करण्यात आली आहे.

- **कालावधी:** ५ जुलै २०२६ पासून प्रवेश प्रक्रिया सुरू होणार असून ३१ जुलै २०२६ रोजी समाप्ती होईल.
- **सहभाग कसा नोंदवावा?:** विद्यार्थ्यांनी 'punepratham.org' च्या अधिकृत वेबसाईटवरून स्वतःची नोंदणी करायची आहे आणि आपले सर्वोत्तम फोटो अपलोड करायचे आहेत.

MVK / Regstr
D.I., NSS
D.I., BSD

- पारितोषिक: या स्पर्धेतील उत्कृष्ट **प्रथम ५ विजेत्यांना रोख रक्कम आणि सन्मानचिन्ह** देऊन महापालिकेतर्फे गौरवण्यात येईल. तरी आपल्या अंतर्गत येणाऱ्या महाविद्यालयांतील जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी या छायाचित्रण स्पर्धेत भाग घ्यावा, यासाठी त्यांना प्रोत्साहित करावे.

२) **'विश्वप्रार्थना - सामूहिक पसायदान पठण' उपक्रम:**

या सेवा वारीचे मुख्य आध्यात्मिक व सामाजिक आकर्षण म्हणजे माऊलींच्या पुणे मुक्कामादरम्यान भवानी पेठ येथे **दिनांक १० जुलै २०२६ रोजी** आयोजित करण्यात आलेली **"विश्वप्रार्थना - सामूहिक पसायदान पठण"** मोहीम. संत ज्ञानेश्वर माऊलींनी विश्वकल्याणासाठी दिलेले पसायदान हे संपूर्ण मानवतेची सेवा आणि समतेचा संदेश देणारे आहे. या पवित्र सोहळ्यात सर्व महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांनी आपल्या संपूर्ण कुटुंबासह डिजिटल लिंकद्वारे ऑनलाईन पद्धतीने मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असा आमचा मानस आहे.

**स्वयंसेवकांसाठी नोंदणी व सहभाग प्रमाणपत्र:**

सर्व इच्छुक विद्यार्थ्यांनी 'पुणे प्रथमच्या' अधिकृत पोर्टलवरून 'punepratham.org' वर जाऊन आपली 'स्वयंसेवक' (Volunteer) म्हणून या मोहिमेत प्रत्यक्ष सहभागी झालेल्या सर्व स्वयंसेवकांना पुणे महानगरपालिकेतर्फे विशेष 'सहभाग प्रमाणपत्र' (Certificate) डिजिटल स्वरूपात दिले जाईल, जे उपक्रमानंतर 'पुणे प्रथमच्या' अधिकृत पोर्टलवरून 'punepratham.org' वरून थेट डाऊनलोड करता येईल.

**आमची नम्र विनंती:**

एक जबाबदार प्रथम नागरिक आणि पुणे शहराच्या सामूहिक जबाबदारीच्या भावनेतून, आपणास नम्र विनंती आहे की, आपल्या स्तरावरून विद्यापीठाशी संलग्न सर्व महाविद्यालयांचे प्राचार्य, राष्ट्रीय सेवा योजना (NSS), एनसीसी (NCC) प्रमुख, सांस्कृतिक मंडळे आणि विद्यार्थ्यांना या 'सेवा वारी', 'कलावारी छायाचित्रण स्पर्धा' व 'विश्वप्रार्थना' मोहिमेची अधिकृत माहिती देऊन, त्यांना यात उत्स्फूर्तपणे सहभागी होण्यासाठी निर्देशित व प्रोत्साहित करावे.

पुण्यातील तरुण शक्तीच्या सळसळत्या उत्साहाने आणि कलागुणांनी या अभियानाला नक्कीच अभूतपूर्व बळ मिळेल, हा आम्हाला ठाम विश्वास आहे.

सहकार्याची अपेक्षा!

आपली विश्वासू,

सौ. मंजुषा दीपक नागपुरे
महापौर, पुणे.